दैनिक देशदूत- 05 जुलै, 2024

# सायबर जागरुकता दिनानिमित्त शपथ ग्रहण

जळगाव । कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात सायबर जागरुकता दिनानिमित्त शपथ घेण्यात आली व सायबर सुरक्षेबाबत मार्गदर्शन करण्यात आले. विद्यापीठातील संगणकशास्त्र प्रशाळा आणि क्वीक हेल फाऊंडेशन,पुणे यांच्यात सामंजस्य करार झाला असून त्याअंतर्गत विविध कार्यक्रम राबविण्यात येतात. विद्यापीठात सुरु असलेल्या रासेयो शिबीरात सायबर जागरुकता दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी शपथ घेतली. संगणकशास्त्र प्रशाळेत अन्य सत्रात संचालक प्रा.एस.आर.कोल्हे यांनी विद्यार्थ्यांना मार्गद्रर्शन केले. विद्यार्थ्यांची रिडल स्पर्धा, डिजीटल पोस्टर्स हे उपक्रम घेण्यात आले. शपथ घेतांना कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा.एस.टी.इंगळे,कुलसचिव डॉ.विनोद पाटील, रासेयो संचालक प्रा.सचिन नांद्रे, प्रा.राजू आमले, पायस सावळे, मयुर बांडे, रेवती फिरके, प्रगती कोल्हे,दर्शन नेवे आदी उपस्थित होते.